# SARASWATI ENGLISH HIGH SCHOOL, NARPOLI BHIWANDI.

Maharashtra State Board - English Medium

Grade - 10 | मराठी अक्षरभारती

Name: ______________ **Diwali Activity (Marathi)** Date: 21/10/2022

Roll No: _________

Time: 01 Hour(s) Marks: 20

**प्र.१ - पत्रलेखन -खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा : (6)**

१ .

नावनोंदणी सुरू

नाट्यरंग
संस्थेतर्फे आयोजित
अभिनय कार्यशाळा
आता तुमच्या परिसरात...

६ ते १६
वयोगटासाठी

प्रशिक्षक : सुप्रसिद्ध कलाकार
सुगंधा शेटे व इतर

[कालावधी १५ एप्रिल ते ३० एप्रिल]

ठळक वैशिष्ट्ये :

- अल्पदरात प्रशिक्षण
- तज्ज्ञ कलावंतांचे मार्गदर्शन
- अनुभवी कलाकारांकडून अभिनय प्रशिक्षण

नोंदणीकरता संपर्क : २६/ २०७, विठोबा निवास
डॉ. अरूणकुमार वैद्य मार्ग,
गोरेगाव (पूर्व) मुं. ४०००९७
भ्रमणध्वनी क्र. XX0XX0XX0XX
Natyarang@gmail.com

| | | |
|---|---|---|
| शाळेचा सांस्कृतिक विभाग-प्रमुख म्हणून तुमच्या शाळेत वरील अभिनय कार्यशाळा राबवण्याबाबत विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा. | **किंवा** | या कार्यशाळेतून प्रशिक्षण घेणाऱ्या व संस्थेतर्फे अभिनयाचे प्रथम पारितोषिक मिळवणाऱ्या तुमच्या मित्राला या संस्थेतर्फे व्यावसायिक नाटकात बालकलाकार म्हणून अभिनय करण्याची संधी मिळाली आहे. त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा. |

**Solution.**

**विनंती पत्र**

दि. २० मार्च २०१९

प्रति,

माननीय श्री. गजानन थोरवे सर,

मुख्याध्यापक,

राजहंस विद्यालय,

कोलडोंगरी अंधेरी (पूर्व)

मुं. ४०० ०९०

**विषय** : शालेय विद्यार्थ्यांकरता अभिनय कार्यशाळा राबवण्याबाबत.

महोदय,

मी अ.ब.क., शालेय सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रमुख या नात्याने सदर पत्र लिहित आहे. दिनांक १९ मार्च २०१९ ला मी नाट्यरंग या अभिनय कार्यशाळेची जाहिरात वाचली. या पत्रासोबत सदर जाहिरात जोडत आहे. ही कार्यशाळा ६ ते १६ वयोगटाच्या विद्यार्थ्यांकरता असून दि. १५ एप्रिल ते ३० एप्रिल या कालावधीत घेण्यात येणार आहे. अभिनय क्षेत्रात प्रगाढ अनुभवी, मालिका, नाटक व चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणाऱ्या सुप्रसिद्ध कलाकार सुगंधा शेटे यांची ही कार्यशाळा आहे. इतर अनुभवी कलाकारांसोबत यांचेही मार्गदर्शन विद्यार्थ्यांस अल्प फी मध्ये लाभणार आहे.

वार्षिक परीक्षा संपल्यानंतर उन्हाळी सुट्टीत आपल्या शाळेत ही कार्यशाळा राबवण्यासाठी आपण परवानगी दिलीत, तर विद्यार्थ्यांमधील सुक्त कलागुणांना वाव मिळेल व त्यांच्या सर्वांगीण विकास साधण्यास मदत होईल.

कृपया, आपल्या शाळेच्या सभागृहात ही अभिनय कार्यशाळा राबवण्यासाठी आपण परवानगी द्यावी ही नम्र विनंती.

आपला कृपाभिलाषी,

अ.ब.क.

शालेय सांस्कृतिक विभाग विद्यार्थी प्रमुख,

राजहंस विद्यालय

कोलडोंगरी, अंधेरी (पूर्व)

rajahans@gmail.com

**किंवा**

**अभिनंदन पत्र**

दिनांक १२ जून २०१९

शशांक कान्होरे

४, जीवनगंधा, जिमखान्याजवळ,

गोरेगाव (पूर्व)

मुंबई - ४०००६३.

प्रिय शशांक,

सप्रेम नमस्कार

अभिनंदन! अभिनंदन! अभिनंदन!

नाट्यरंग संस्थेतर्फे अभिनयाचे बालकलाकार म्हणून निवड झाल्याबद्दल तुझे त्रिवार अभिनंदन!

शशांक, अभिनयाचे बाळकडू तुला जन्मत:च मिळाले आहे. शाळेत सगळ्या शिक्षकांच्या नकला तू किती हुबेहुब करतोस! शळेच्या प्रत्येक स्नेहसंमेलनात तू तुझ्या अभिनयाचा ठसा उमटवला आहेस. आताच्या कार्यशाळेतही प्रत्येक गोष्ट टीपकागदाप्रमाणे तू आत्मसात केलीस. आवाजाची फेक, सभाधीटपणा हे गुण तर तुझ्यात आहेतच. यामुळेच तर तुणी निवड व्यावसायिक नाटकात झाली. आम्हा मित्रांसाठी, तुझ्या आईवडिलांसाठी, शाळेसाठी ही निश्चितच अभिमानास्पद गोष्ट आहे. अभिनय क्षेत्रात तू एक नामवंत व गुणी कलाकार म्हणून प्रसिद्धीस येशील, यात शंकाच नाही. माझ्या घरच्यांनीही तुझे खूप कौतुक केले आहे.

पुन्हा एकदा भविष्यातल्या 'भावी अभिनेत्र्याला' अनेक शुभेच्छा! ती स्व. काकाकाकूंना साष्टांग नमस्कार. छोट्या स्वराला अनेक आशीर्वाद.

कळावे,

लोभ असावा.

तुझा मित्र

अ.ब.क.

२८/२०६, समृद्धी,

नाईकवाडी,

गोरेगाव (पूर्व)

मुंबई-४०००६३.

abc13@gmail.com

**प्र.२ - खालीलपैकी कोणतीही एक कृती सोडवा: (Any 1)** **(5)**

अ . **पुढील जाहिरात वाचून त्यापुढे दिलेल्या कृती करा:**

**श्री. हनुमंत वाळके यांची व्यायामशाळा**

## वाळके शक्ती जिम

**आमची खास वैशिष्ट्ये :-**


- स्वत:सोबत एक व्यक्ती आणा.
- १० % सवलत मिळवा.
- वातानुकूलित प्रशस्त जागा
- सोयीस्कर वेळा
- आधुनिक यंत्रसामग्री
- अनुभवी शिक्षक
- माफक फी

**: पत्ता :**


निरामय सदन, शास्त्री मार्ग, जळगाव

प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य.


**(१) पुढील आकृतिबंध पूर्ण करा.** ०२




**(२) पुढील आकृती पूर्ण करा :** ०२





**(३) पुढील आकतिबंध पूर्ण करा.** ०१





**Solution.**


**(१) पुढील आकृतिबंध पूर्ण करा.**




**(२) पुढील आकृती पूर्ण करा :**



**(३) पुढील आकतिबंध पूर्ण करा.**




आ . पुढील विषयावर बातमी तयार करा :

शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शोधून त्यांना शाळेत आणणाऱ्या कोल्हापूर येथील ज्ञानोदय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा कौतूक सोहळा ३० जून रोजी आयोजित करण्यात आला.

**Solution.**

**शाळाबाह्य मुलांना शाळेत आणणाऱ्यांचा कौतुकाचा सोहळा**

**म.टा.प्रतिनिधीकडून**


**कोल्हापूर (३० जून) :** येथील ज्ञानोदय विद्यालयाच्या काही विद्यार्थ्यांनी शाळाबाह्य मुले शोधली आणि त्यांना शाळेत आणले. शाळाबाह्य पंधरा मुलांना शाळेत आणल्यामुळे परिसरातील सर्वांना या मुलांना शोधणार्यांचे कौतुक वाटले. हे कार्य पार पाडणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कौतुकाचा हृद्य सोहळा नुकताच शाळेत पार पडला. परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक या सोहळ्याला हजर होते. मुख्याध्यापक, शिक्षक यांनी त्या विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. शाळाबाह्य मुलांचे पालकही हजर होते. त्यांनी मोडक्यातोडक्या शब्दांत आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी सर्वांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

शिक्षणाधिकारी श्रीमती फडके आवर्जून उपस्थित होत्या. त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. चहापानानंतर समारंभाची सांगता झाली.

**प्र.३ - खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा: (Any 1) (8)**

अ. **प्रसंगलेखन**

**मी पाहिलेले चित्रप्रदर्शन**




**वरील प्रसंगी तुम्ही उपस्थित होता अशी कल्पना करून या प्रसंगाचे लेखन करा.**

**Solution.**

आमच्या शाळेत दरवर्षी प्रदर्शने भरवली जातात. लोकसंख्या, साक्षरता यांसारख्या विषयांवर ती असतात. आम्ही सगळेच आवडीने ती प्रदर्शने पाहत असतो. या वर्षी मात्र शाळेत एक अनोखे प्रदर्शन भरवले होते. कारगिल, सियाचीनसारख्या हाडे गोठवणाऱ्या थंडीत भारताच्या सीमचे संरक्षण करणाऱ्या सैनिकांचे होते.


आपल्या सैनिकांना थंड हवामानाच्या प्रदेशात खाताना, पिताना प्रचंड त्रास होतो. खाद्यपदार्थ गरम करतानाही प्रचंड त्रास होतो. हा सर्व त्रास चित्रात दिसत होता. जखमी सैनिकांवर उपचार करण्याचे कष्ट त्या चित्रांतून लक्षात येत होते.

मच्छर-कीटक यांचा त्रास तेथे मोठ्या प्रमाणावर सहन करावा लागतो. गस्त घालताना काही वेळेस सैनिक बर्फात रुततात. त्याच हवामानात अतिरेक्यांशी सामना करावा लागतो इत्यादी गोष्टी मला चित्रांमुळे कळल्या.

अशा कष्टप्रद परिस्थितीचा सामना करताना आपल्या साथीदार सैनिकाचा मृत्यू पाहणे हे तर अधिक दु:खदायक होते.

चित्रे पाहताना माझ्या जिवाचा थरकाप उडत होता. त्यांचे होणारे हाल पाहवत नव्हते. आम्ही दिवाळी, होळी दणक्यात साजरी करतो. आपले सैनिक मात्र त्याच वेळी कष्टप्रद जीवन जगत असतात. त्या सर्व सैनिकांना मी मनापासून म्हणाले, ‘जय जवान’. चित्र चितारणाऱ्या कॅप्टन पुरोहित यांचे मी मनापासून आभार मानले. कारण सैनिकांच्या चेहऱ्यावरील चितारलेले भाव मी कधीच विसरू शकणार नाही. खरोखरच माझ्यासाठी हे प्रदर्शन अनोखे होते.

आ . **आत्मकथन — फलाटाचे आत्मवृत्त**




वरील घटक तुमच्याशी बोलतो आहे, अशी कल्पना करून त्या घटकाचे आत्मवृत्त लिहा.

**Solution.**


अरे अरे थांब काय करतोस? रुळांवर उडी मारतोस? गाडी आली तर काय होईल? नुसत्या कल्पनेने घाम फुटतो. अनेकांच्या देहाचे तुकडे झालेले मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहेत. कोण बोलतंय म्हणून काय विचारता? मी फलाटदादा (प्लॅटफॉर्म) बोलतोय !

कुठून कुठून लोक येतात. गाडीच्या प्रतीक्षेत माझ्या अंगावर तासन्‌तास उभे राहतात. आपापल्या कामाच्या ठिकाणी सहजपणे जातात. विविध भाषा, धर्म, पेहराव यांचे नावीन्य मी रोज अनुभवत असतो. कधी कधी गर्दीमुळे भांडणे, रेटारेटी, मारामारी होते. तेव्हा मी व्यथित होतो. काही प्रवासी माझ्या अंगावर पानाच्या पिचकाऱ्या मारतात. प्लास्टिकच्या पिशव्या, सिगारेटची थोटके माझ्या अंगावर फेकतात. तुमच्या अंगावर फेकली तर चालतील का?

साफसफाई कामगार मला दिवसातून बऱ्याच वेळा साफ करतात. पण ‘स्वच्छ’चे ‘अस्वच्छ’मध्ये लगेच रूपांतर होऊ लागते.

रात्री बारानंतर अनेक बेघर कुटुंबे माझ्या आश्रयाला येतात. मी आनंदाने त्यांना माझ्या कवेत घेतो. देशाच्या कानाकोपऱ्यांतील लोक इच्छित स्थळी जाण्यासाठी माझ्याकडे धावत येतात तेव्हा मी स्वत:ला धन्य समजतो.

इ . **संगणक : काळाची गरज या विषयावर पुढील मुद्द्यांच्या आधारे वैचारिक लेखन करा :**




**Solution.**

**संगणक : काळाची गरज**

'आमची शाळा डिजिटल आहे,' हे वाक्य उच्चारताना आज प्रत्येक शाळेला अभिमान वाटतो. त्याला कारणही तसेच आहे. आज शाळेच्या सर्व कामकाजाचे संगणकीकरण झाले आहे. या संगणकाचा जन्म पाश्चिमात्य देशात झाला. चार्लस् बॅबेज हा संगणकाचा जन्मदाता. इ.स. १८३२ मध्ये संगणक जन्माला आला. सुरूवातीला संगणक भरभक्कम व मोठा होता. पण जसजसा संगणक विकसित होऊ लागला, तसतसा त्याचा आकार अधिकाधिक लहान होत गेला आणि कर्तृत्वाच्या कक्षा मात्र सतत रुंदावतच गेल्या. म्हणून तर आज सर्वत्र संगणकाचे राज्य आपणांस दिसते.

एकविसावे शतक हे 'ज्ञानयुग' आहे आणि या ज्ञानयुगाचा कळस म्हणजे संगणक! आज या संगणकाला 'अशक्य' हा शब्द माहीत नाही. एके काळी संगणक ही फक्त शास्त्रज्ञांची मक्तेदारी होती. पण आज तो जनसामान्यांचा सेवेकरी झाला आहे. आपण प्रवासाला निघतो तेव्हा आपल्या प्रवासातील रेल्वेच्या वा विमानाच्या तिकिटांचे आरक्षण संगणक करतो. आपल्या घरात दरमहिन्याला येणारी विजेची व दूरध्वनीची बिले, विम्याचा हप्ता भरण्याची सूचना देणारी स्मरणपत्रे संगणक तयार करतो. संगणकाने सर्व कामे सोपी, सुलभ आणि शिस्तीची केली आहेत.

आणि आता तर मोबाईलमध्ये संगणक अवतरल्यामुळे दैनंदिन कामे विलक्षण वेगात व कार्यक्षमतेने करता येऊ लागली आहेत. त्यामुळे अखंड जगच खिशात आले आहे.

असे या संगणकाचे अधिराज्य सर्वत्र आहे. म्हणून या संगणकाचे आपण गुलाम झालो आहोत काय? असा प्रश्न पडतो. पण विचारांती या प्रश्नातील फोलपणा लक्षात येतो. एक गोष्ट नक्की की, या संगणकाचा निर्माता माणूस आहे. माणूसच संगणकाला माहिती व आज्ञावली देतो. शेवटी नियंत्रक माणूसच आहे!!

**प्र.४ - व्याकरण व भाषिक घटकांवर आधारित कृती:** **(1)**

१ . विरूद्धार्थी शब्द लिहा :

०१

(i) गरीब ×

(ii) लहान ×

**Solution.**

(i) गरीब × श्रीमंत

(ii) लहान × मोठा